☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट /229/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 09/06/2025

# 1)खुन :–

**हिमायतनगर :–**दिनांक 03.06.2025 रोजी 17.00 ते दिनांक 05.06.2025 वा. चे दरम्यान, **मयताचे राहाते घरात मौ. टेभुंर्णी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे**, यातील मयत नामे गयाबाई रामजी तवर ऊर्फ देवसरकर, वय 75 वर्षे रा. टेभुंर्णी ता. हिमायतनगर हिस तिचा नातु आरोपी नामे मारोती ऊर्फ बाळु पांडुरंग वानखेडे, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. दिघी ता. हिमायतनगर यांने आपले आजीचे घरातुन 23 ग्रॅम सोन्याचे दागीने किंमत 1,84,000/–रू चे नगदी 90,000/–रू असा एकुण 2,74,000/–रू चा ऐवज जबरीने काढुन घेवुन आपल्याच आजीचा खुन केला. वगैरे **फिर्यादी किशनराव दत्तराव वानखेडे, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती व बैल विक्री रा. टकळी ता. उमरखेड जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 122/2025 कलम 103(1), 309 भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री अमोल भगत, मो.क्रं. 9821869685** हे करीत आहेत.

# 2)मो.सा.चोरी :–

**1)धर्माबाद :–**दिनांक 05.06.2025 रोजी 21.00 ते दिनांक 06.06.2025 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोरून सरस्वतीनगर धर्माबाद नांदेड येथे**, यातील फिर्यादीची ॲक्टिवा होंडा कंपणीची स्कुटी क्रमांक एमएच–26/सीआर–6840 किंमत 70,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मनमोहनराव शंकरराव कदम, वय 46 वर्षे, व्यवसय नौकरी रा. गुरूकुल विद्यालय धर्माबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 157/2025 कलम 303(2) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2006 मुस्तापुरे, मो.नं. 9325850996** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–**दिनांक 04.06.2025 रोजी रात्री 22.40 वा. चे सुमारास, **फुले मार्केट जवळील न्यु. ग्रीन चॅट भांडार समोर नांदेड येथे**, यातील फिर्यादीची हिरो कंपणीची पॅशन प्रो मो सा क्रमांक एमएच–26/एवाय–6921 किंमत 30,000/–रू चे नमुद ठिकाणी लावुन पाण्याची बॉटल आणण्याकरीता गेला असता नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सुरेश गोविंदराव वाढवणे, वय 43 वर्षे, व्यवसय खाजगी नौकरी रा. शेलगाव गौरी ता. नायगांव ह. मु. वसंतनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 221/2025 कलम 303(2) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 शिरसाट, मो.नं. 7020510553** हे करीत आहेत.

# 3)चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 06.06.2025 रोजी 10.00 ते 02.30 वा. चे दरम्यान, **ईब्राहीम मजीद जवळ रहीमपुर दुधडेरी समोर नांदेड येथे**, यातील फिर्यादीने अनावधानाने घराचे कुलूप न लावल्याने उघडे घरातुन यातील अज्ञात आरोपीने बेडरूम मध्ये गादीचे खाली ठेवलेले 14 ग्रॅमचे सोन्याचे गळसर किंमत 98,000/–रू, 07 ग्रॅम सोन्याचे गंठण किंमत 49,000/–रू, साडेतीन ग्रॅमचे मनी मंगळसुत्र किंमत 24,500/–रू असा एकुण 1,71,500/–रू चा ऐवज कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शेख मौला पि. मोहमद, वय 47 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. ईब्राहीम मजीद जवळ रहिमपुर दुध डेअरी समोर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण गुरनं 552/2025** कलम 303(2) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री भिसे, मो. नं. 8459138963** हे करीत आहेत.

# 4)अवैध रेती चोरी :–

**मरखेल :–**दिनांक 08.06.2025 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **माळेगांव ते चेंडेगाव जाणारे रोडवर ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील आरोपी नामे सायलु हूलंना पेंटलवार, वय 35 वर्षे, व्यवसाय ट्रॅक्टर चालक रा. हंगरगा मंडल ता. जुक्कल जि. कामारेड्डी राज्य तेलंगणा हा विना परवाना बेकायदेशिररीत्या आपले ताब्यातील विना नंबरचे ट्रॅक्टर हेड व ट्रॉली किंमत 4,50,000/–रू चे मध्ये 01 ब्रास रेती किंमती 6,000/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री रवी माधवराव हुंडेकर, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 143/2025 कलम 303(2), बीएनएस–2023 सह कलम 48(7),(8), म. ज. म. अधिनियम कायदा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/श्री शेख, मो.क्रं. 7776067774** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**1)मुदखेड :–**दिनांक 08.06.2025 रोजी 10.00 वा. चे सुमारास, फिर्यादीचे शेतात गट नं 51 मौ. मुदखेड ता. मुदखेड **जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.तानाजी शंकरराव शेटे, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती मुदखेड 2. संजय मिटकरी, वय 35 वर्षे, रा. कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली 3. नंदकुमार लंगडे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. वेदांतनगर नांदेड, यांनी संगणमत करून फिर्यादी हा त्याचे मोटार सायकलवर बसुन शेताकडे जात असतांना जमीनीच्या वादावरून फिर्यादीची मोटारसायकल अडवुन वडिलोपार्जीत जमीनीबाबत वाद करून शिवीगाळ व थापडाबुक्यानी मारहाण करून आरोपीतानी लाकडाने फिर्यादीचे डावे दंडावर जबर मारहाण करून डावे पायावर घुडघ्याखाली मारून फ्रॅक्चर करून गंभीर दुखःपत केली शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सुरेश शंकरराव शेटे, वय 53 वर्षे, व्यवसाय शेती रा. मठगल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 103/2025 कलम 117(2),118(1),115(2),351(3), 352, 126(2), 3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बंडु गवई, मो.नं. 9579613649** हे करीत आहेत.

**2)उमरी :–**दिनांक 07.06.2025 रोजी सकाळी 10.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतात मौ. राव धानोरा बु. ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.मारुती देवराव पुंडगे 2. श्रीकांत बाबुराव पुंडगे, 3. मुरलीधर जगन्नाथ पुंडगे,4. रंजीत लक्ष्मण पुंडगे, 5. गोविंद देवराव पुंडगे, 6.तिरुपती लक्ष्मण पुंडगे, 7. श्रीधर जगन्नाथ पुंडगे, सर्व रा. बिजेगाव ता. उमरी यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन शेतीच्या जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादीचे शेतातुन बैलगाडया घेवुन जात असतांना फिर्यादीने हा रस्ता तुमचा नाही असे म्हणाले असता फिर्यादीस काठीने डाव्या पायाच्या मांडीवर मारत असतांना यातील साक्षीदार सोडवण्यास आले असता लोखंडी रॉडने साक्षीदारास डाव्या हातावर मारून गंभीर दुखःपत केली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मारुती आनसाजी हंबर्डे, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 187/2025 कलम 118(2),115(2),351(2),(3), 189(2), 191(2), 190 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1985 शिंदे, मो.नं. 7721005054** हे करीत आहेत.

**3)उमरी :–**दिनांक 08.06.2025 रोजी दुपारी 14.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतात मौ. रावधानोरा बु. ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.भगवानराव सरजे यांचा मुलगा 2. कृष्णा भगवानराव सरजी, 3.रितिक अमृतराव सर्जे, सर्व रा. रावधानोरा बु. ता. उमरी जि. नांदेड, यांनी संगणमत करून शेतीच्या जुन्या भांडणावरून फिर्यादी हा शेतामध्ये सरकारी मोजणी भरून कब्जा करीत असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादीस मारहाण करीत असतांना साक्षीदार हनुमंतराव नारायण सर्जे हे सोडवण्यास आले असता आरोपीतांनी उजव्या चाळयावर मारून गंभीर दुखापत केली. शिवीगाळ करून, जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी भगवानराव नारायणराव सर्जे, वय 59 वर्षे, व्यवसाय शेती रा. राव धानोरा बु. ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 188/2025 कलम 118(2),115(2),351(2),(3), 352, 126(2), 3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री सुर्यवंशी, मो.नं. 9923451146** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड